# महाडिक अभियांत्रिकीमध्ये इंटरनॅशनल आऊटरिच सेंटर

## राहुल महाडिक

**इस्लामपूर / प्रतिनिधी :** नानासाहेब महाडिक अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याकरिता त्यांना परदेशी विद्यापीठात उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महाविद्यालयामध्ये इंटरनॅशनल आऊटरिच सेंटरची स्थापना करण्यात आल्याची माहिती श्री व्यंकटेश्वरा शिक्षण संस्थेचे सचिव राहुल महाडिक यांनी दिली.

इंटरनॅशनल आऊटरिच सेंटरकरीता नानासाहेब महाडिक अभियांत्रिकी महाविद्यालय व पाथ सीड्स ग्लोबल एज्युकेशन, कोल्हापूर सामंजस्य करार करण्यात आला. कार्यकारी संचालक प्रा. महेश बी. जोशी म्हणाले, हे अभियांत्रिकी महाविद्यालय नेहमीच विद्यार्थीभिमुख उपक्रम राबवण्यात अग्रेसर राहिले आहे. तसेच इंटरनॅशनल आऊटरिच सेंटरच्या माध्यमातून अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांचा ठसा उमटवण्याची संधी महाविद्यालयाने उपलब्ध करून दिली आहे. विद्यार्थी त्यात नक्कीच यशस्वी होतील अशी खात्री आहे. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. कुलकर्णी म्हणाले, या करारामुळे जे विद्यार्थी फॉरेन युनिव्हर्सिटीमध्ये जाऊन अद्ययावत उच्च शिक्षण घेऊ इच्छितात अशा विद्यार्थ्यांना लाभ होणार आहे. या इंटरनॅशनल आऊटरिच सेंटर अंतर्गत विद्यार्थ्यांना फॉरेन युनिव्हर्सिटी कशी निवडावी, त्याकरिता कोणती परीक्षा देणे आवशयक आहे, परदेशी शिक्षणाकरिता उपलब्ध शैक्षणिक कर्ज सुविधा, व्हिसा प्रोसेस तसेच युनिव्हर्सिटी व कोर्स शॉर्टलिस्टिंग या करता मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

इंटरनॅशनल आऊटरिच सेंटरद्वारे महाविद्यालयात शिकणारे विद्यार्थी व त्यांच्या पालकांकररता दर आठवड्याला कौंसेलिंग सेशन आयोजित करण्यात येणार आहेत. या सेशन करीता पाथ सीड्स ग्लोबल एज्युकेशन, कोल्हापूर यांचे तज्ज्ञ कौन्सेलर्स समुपदेशन करतील. याप्रसंगी प्रा. निलेश साने, प्रा. अमोल पाटील, पाथ सीड्स ग्लोबल एज्युकेशन, कोल्हापूरचे सलील राजगुरू, सानिका डोईफोडे हे उपस्थित होते.




**इस्लामपूर : नानासाहेब महाडिक अभियांत्रिकी महाविद्यालय व पाथ सीड्स ग्लोबल एज्युकेशन, कोल्हापूर सामंजस्य कराराप्रसंगी डॉ. व्ही. ए. कुलकर्णी, सानिका डोईफोडे व अन्य.**